# जिल्हाधिकारी कार्यालय, धुळे

( जिल्हा सेतु व ई-प्रशासन विभाग )

ई-मेल आय डी - setu.dhule@maharashtra.gov.in दुरध्वनी क्रमांक - 02562-288711/12

क्रमांक-ई/सेतू/कावी/ 181 /2022 दिनांक:-30/06/2022

## जाहिरात

जिल्हा सेतु समिती जिल्हाधिकारी कार्यालय धुळे येथे कार्यालयीन कामकाज पहाणीकामी कंत्राटी पध्दतीने मानधन तत्वावर जिल्हा सेतु समन्वयक म्हणुन सन 2022-23 या वर्षाकरिता नियुक्ती करणेकामी खालील पात्रतेनुसार तसेच अटीशर्तीवर जाहिरात प्रसिध्द करण्यात येत आहे.

| अ.क्र. | पदाचे नाव | पद संख्या | पात्रता | अटीशर्ती |
|---|---|---|---|---|
| १ | जिल्हा सेतु समन्वयक | १ | १) सेवानिवृत्त नायब तहसिलदार.<br>२) स्वेच्छा सेवानिवृत्ती घेतलेला नसावा.<br>३) MSCIT उत्तीर्ण.<br>४) वय 70 पेक्षा कमी. | अटी शर्ती कामी सर्व माहिती www.dhule.gov.in या संकेतस्थळांवर उपलब्ध आहे. |

**अर्जा करणेसंबंधी मुदतीचा तपशील ( सुटीचे दिवस सोडून )**

| अ.क्र. | तपशिल | दिनांक व वेळ |
|---|---|---|
| 1. | अर्ज स्विकृती सुरु दिनांक व वेळ | दि.05/07/2022 सकाळी 11.00 वाजे पासुन |
| 2. | अर्ज स्विकृती अंतिम दिनांक व वेळ | दि.12/07/2022 दुपारी 4.00 वाजेपर्यंत |
| 3. | अर्ज छानणी दिनांक व वेळ | दि.15/07/2022 दुपारी 12.00 वाजेपासुन. जिल्हाधिकारी कार्यालय, धुळे. |
| 4. | मुलाखत दिनांक व वेळ | स्वतंत्रपणे कळविण्यात येईल. |

www.dhule.gov.in या संकेतस्थळांवर सदर जाहिरातीसंबंधी सविस्तर माहिती उपलब्ध असुन अर्जदाराने आपला अर्ज सेतु शाखा, जिल्हाधिकारी कार्यालय धुळे येथे मुदतीत समक्ष सादर करणे बंधनकारक आहे.

( जलज शर्मा )
अध्यक्ष, जिल्हा सेतू समिती
तथा जिल्हाधिकारी, धुळे

# जिल्हाधिकारी कार्यालय, धुळे

( जिल्हा सेतु व ई-प्रशासन विभाग )

ई-मेल आय डी - setu.dhule@maharashtra.gov.in दुरध्वनी क्रमांक - 02562-288711/12

क्रमांक-ई/सेतू/कावी/181 /2022 दिनांक:-30 /06/2022

**जिल्हा सेतु समिती जिल्हाधिकारी कार्यालय धुळे येथे कार्यालयीन कामकाज पहाणेकामी कंत्राटी पध्दतीने मानधन तत्वावर सन 2022-23 या वर्षाकरिता जिल्हा सेतु समन्वयक म्हणुन नियुक्ती करणेकामी जाहिरात**

जिल्हा सेतु समिती जिल्हाधिकारी कार्यालय धुळे येथे कार्यालयीन कामकाज पहाणीकामी कंत्राटी पध्दतीने मानधन तत्वावर जिल्हा सेतु समन्वयक म्हणुन सन 2022-23 या वर्षाकरिता नियुक्ती करणेकामी खालील पात्रतेनुसार तसेच अटीशर्तीवर जाहिरात प्रसिध्द करण्यात येत आहे.

कंत्राटी पध्दतीने जिल्हा सेतु समन्वयक यापदी नियुक्तीकामी अर्ज व तद्संबंधीत कागदपत्र सादर करणेचा कालावधी व ठिकाण खालीलप्रमाणे आहे.( सुटीचे दिवस सोडून )

| अ.क्र. | अर्जा संबंधी तपशिल | दिनांक व वेळ |
|---|---|---|
| 1. | अर्ज स्विकृती सुरु दिनांक व वेळ | दि. 05/07/2022 सकाळी 11.00 वाजे पासुन |
| 2. | अर्ज स्विकृती अंतिम दिनांक व वेळ | दि. 12/07/2022 दुपारी 4.00 वाजेपर्यंत |
| 3. | अर्ज छानणी दिनांक व वेळ | दि. 15/07/2022 दुपारी 12.00 वाजेपासुन. जिल्हाधिकारी कार्यालय, धुळे. |
| 4. | मुलाखत दिनांक व बेळ | स्वतंत्रपणे कळविण्यात येईल. |

www.dhule.gov.in या संकेतस्थळांवर सदर जाहिरातीसंबंधी माहिती उपलब्ध असुन अर्जदाराने आपला अर्ज सेतु शाखा , जिल्हाधिकारी कार्यालय धुळे येथे मुदतीत समक्ष सादर करणे बंधनकारक आहे.

## जिल्हा समन्वयक सेतु यापदासाठी आवश्यक कागदपत्र व अटीशर्ती

१) अर्जदार हे सेवानिवृत्त नायब तहसिलदार असणे आवश्यक असुन सदर अधिकारी सेवा समाप्तीपुर्वी स्वइच्छेने सेवानिवृत्त झालेला नसावा. ( सेवानिवृत्ती संबंधीत कागदपत्र अर्जासोबत जोडावे ),
२) शासन निर्णय दि.17/12/2016 मधील सर्व अटीशर्ती लागु राहतील या बदलचे अर्जदाराचे सहमतीपत्र.
३) अर्जदार यांना संगणकीय ज्ञान असल्याबाबत MSCIT चे प्रमाणपत्र.
४) सदर अधिकारी यांनी पोलीस विभागाकडील चारित्रपडताळणी प्रमाणपत्र.
५) संबंधीत अधिकारी / कर्मचारी यांनी शारिरीक व मानसीक दृष्ट्या सक्षम असल्याबाबत जिल्हा शल्य चिकीत्सक यांचे प्रमाणपत्र सादर करावे.
६) निवृती वेतन व मानधन व ईतर स्त्रोत याव्दारे प्राप्त उत्पन्नाचे विवरणपत्र भरणे, व्यवसायकर भरणे हे संबंधीतांची जबाबदारी राहील, व सदर कागदपत्र कार्यालयास सादर करणे बंधनकारक राहील.

## नियुक्ती संबंधी अटीशर्ती

१) सदरची नियुक्ती ही पूर्णता मानधन तत्त्वावर सेतू शाखेकडील कामाच्या आवश्यकतेनुसार सन 2022-23 या वर्षाकरिता असेल तसेच या अनुषंगाने कोणत्याही स्वरुपात शासकीय सेवेत दावा करता येणार नाही.

२) नियुक्त अधिकारी यांना विहित कामासाठी दौरा करावा लागल्यास त्यांना निवृतीच्या वेळी शेवटच्या वेतनावर प्रवास भत्ता या जाहिरातीच्या आदेशाच्या दिनांकास लागु असलेले दर देण्यात येतील.

३) शासन निर्णय दि.17/12/2016 अन्वये सदर नियुक्ती 70 वर्ष किंवा सलग 3 वर्ष यापैकी जे आगोदर घडेल तोपर्यंतच संबंधीत कर्मचारी / अधिकारी कार्यरत राहील,

४) अर्जदार यांना महसुल प्रशासन व तत्संबंधीत लेखे ठेवणेबाबत परीपुर्ण ज्ञान असणे बंधनकारक.

५) सदरची नेमणुक जिल्हा सेतु समन्वयक ( ई-प्रशासन ) म्हणुन असली तरी सेतु समितीकडे आवश्यक असलेले सेतु संबंधीत कामकाज तसेच सर्व शासकीय कामकाजासोबत अती महत्वाचे कामकाज पाहणे बंधनकारक राहील.

६) जिल्हा समन्वयक यांना देय असणारे मानधन हे शासन निर्णय दि.10/10/2011 नुसार कार्यालयीन स्वरुपाचा खर्च म्हणून मनुष्यबळाची नेमणुक या उद्दिष्टांकरिता जिल्हा सेतू निधीतुन अदा करण्यात येईल तसेच याकामी देय असलेले मानधन हे दरमहा रक्कम रु.25000/- अदा करण्यात येईल.

७) जिल्हा सेतू समितीस आपल्या सेवेची आवश्यकता नसल्यास किंवा काम समाधानकारक नसल्यास शासनाच्या प्रचलित नियमांच्या तरतुदीनुसार केंव्हाही विनानोटीस कार्यमुक्त करण्यात येईल.

८) मुदतीनंतर प्राप्त होणारे अर्ज विचारात घेतले जाणार नाही.

९) प्राप्त अर्ज नाकारणे अथवा स्विकारणे संबंधी संपुर्ण अधिकार म. जिल्हाधिकारी धुळे यांना राहतील.

( जलज शर्मा )
अध्यक्ष, जिल्हा सेतू समिती
तथा जिल्हाधिकारी, धुळे